**आकाशवाणी नागपूर,**

**प्रादेशिक वृत्त विभाग**

**प्रादेशिक बातम्या (मराठी-वेळ सायंकाळी ०६.०५ )**

**बुधवार दिनांक ८ जुलै २०२६**

**ठळक बातम्या....**

**1. भारतीय नागरिक सुरक्षा संहिता, महाराष्ट्र सुधारणा विधेयक आज विधान परिषदेत संमत**

**2. 'झाडीपट्टी' सह आणखी ४ पारंपरिक लोककलांचा लोककला अनुदान योजनेत समावेश**

**3. वनहक्क कायद्यांतर्गत मिळालेल्या जमिनींवर आदिवासींना स्वतंत्र सातबारा उतारा आणि गाव नमुना १२ ई लागू करण्यात येणार**

**आणि**

**4. जमीन अधिग्रहण मोबदला प्रकरणात वाशीम जिल्हा न्यायालयाने दिले टोल प्लाझा जप्त करण्याचे आदेश**

**आता सविस्तर बातम्या ......**

**भारतीय नागरिक सुरक्षा संहिता**

भारतीय नागरिक सुरक्षा संहिता, महाराष्ट्र सुधारणा विधेयक आज विधान परिषदेत संमत झाले. या विधेयकामुळे कुठल्याही नागरिकावर अन्याय होणार नाही याची ग्वाही देत संयुक्त समितीकडे हे विधेयक पाठवण्याची गरज नसल्याचं त्यांनी स्पष्ट केलं. विधेयकातल्या तरतुदींना विरोध करत विरोधकांनी हे विधेयक मंजूर करताना सभात्याग केला. Digital माध्यमातून देशाच्या आणि राज्याच्या विरोधात मतप्रदर्शन करणाऱ्या साहित्यावर बंदी आणण्याची तरतूद या विधेयकात आहे, असं गृहराज्यमंत्री योगेश कदम यांनी आज विधान परिषदेत सांगितलं. आतापर्यंत प्रिंट स्वरूपात असलेल्या साहित्यावर बंदी घालता येत होती असं त्यांनी स्पष्ट केलं होतं. याशिवाय गुन्हा करू शकतो अशी शक्यता असलेल्या व्यक्तींना प्रतिबंधात्मक कारवाई म्हणून २४ तासाऐवजी १५ दिवस ते १ महिना कालावधीसाठी ताब्यात घेण्याची तरतूद यात आहे. त्यासाठी न्यायालयाची परवानगी आवश्यक

असेल असं त्यांनी स्पष्ट केलं. भारतीय दंड संहितेत अशाप्रकारची तरतूद होती, मात्र भारतीय न्याय संहितेत ही तरतूद नसल्याने या विधेयकात ही तरतूद केल्याचे गृह राज्यमंत्री म्हणाले.ऐकुया आजच्या विधिमंडळ कामकाजाचा आढावा आमच्या प्रतिनिधींकडून -

विधी मंडळ

*(व्हॉइस कास्ट - नम्रता)*

*मुंबईमध्ये एकात्मिक पूरनियंत्रणासाठी १३ हजार कोटी रुपयांचाआराखडा राज्य सरकारने केंद्राला सादर केला असून त्याद्वारे मुंबईत ३७० हॉटस्पॉट्स ठरवले आहेत. पाऊस आणि भरती एकाच वेळी असताना या ठिकाणांवरसाचणारं पाणी अर्ध्या तासात बाहेर कसं काढता येईल, यावर या आराखड्यातभर दिला आहे, अशी माहिती मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीसयांनी आज विधानसभेत दिली. राज्यात पावसामुळे झालेल्या हानीबाबत त्यांनी आज निवेदन दिलं. मिसिंग लिंकजवळ दरड कोसळल्याप्रकरणी, इथली सुरक्षाव्यवस्था आणखी भक्कम कशी करता येईल, याबाबत आआयटी मुंबईच्या तज्ज्ञांकडून शिफारशी मागवल्या आहेत, असंही ते म्हणाले.मुंबईत जेजे आणि केईएम रुग्णालयात २-३ मशीनद्वारे, चिरफाड न करता शवविच्छेदन प्रक्रिया सुरू होईल. ही प्रक्रिया यशस्वी झाली तर राज्यात सर्वत्र मशीनच्या माध्यमातून शवविच्छेदन सुरू करू अशी माहिती मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी विधान परिषदेत प्रश्नोत्तराच्या तासात दिली. ९० टक्के प्रकरणांमध्ये मशीनद्वारे आणि १० टक्के गंभीर प्रकरणात पारंपरिक आणि मशीन अशा दोन्ही प्रकारे शवविच्छेदन करता येईल, असं ते म्हणाले. शवविच्छेदकांची रिक्त पदं भरण्याची प्रक्रिया लवकर पूर्ण करू असं आश्वासनही त्यांनी दिलं.येत्या १० वर्षात राज्य परिवहन महामंडळाच्या सर्व बस इलेक्ट्रिक करणार आहोत. हे काम पूर्ण झाल्यावर अशा प्रकारे सार्वजनिक वाहतूक व्यवस्थेत पूर्णपणे इलेक्ट्रिक बसचा वापर करणारं महाराष्ट्र हे पहिलं राज्य असेल अशी माहिती परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांनी विधान परिषदेत प्रश्नोत्तराच्या तासात दिली. राज्यात एप्रिल २०२४ ते जानेवारी २०२६ दरम्यान ४ हजार २८१ अपघात झाले. याप्रकरणी चालकांवर*

*नियमानुसार कारवाई केल्याची माहिती त्यांनी लेखी उत्तरात दिली. तापर्यंत ६७ लाख नागरिकांनी एन सी एम सी कार्ड काढल्याची माहिती त्यांनी दिली.  राज्यातल्या समृद्‌ध लोककला परंपरेचं जतन, संवर्धन आणि प्रसार करण्यासाठी राज्य शासनाने लोककला अनुदान पॅकेजचा विस्तार करण्याचा महत्त्वपूर्णनिर्णय घेतला आहे. यापुढे 'नमन खेळे', 'जाखडी', 'वहीगायन' आणि 'झाडीपट्‌टी' या चार पारंपरिक लोककलांचा, लोककला अनुदान योजनेत समावेश करण्यात येणार असल्याची घोषणा सांस्कृतिक कार्यमंत्री आशिष शेलार यांनी विधानसभेत केली. या योजनेअंतर्गत प्रत्येक लोककला प्रकारातल्या २० कलापथकांना प्रत्येकी ५० हजार रुपये याप्रमाणे १०लाख रुपये वार्षिक अनुदान देण्यात येणार आहे.*

**स्वतंत्र सातबारा उतारा**

राज्यातील लाखो आदिवासी आणि पारंपरिक वननिवासी बांधवांना आर्थिकदृष्ट्या सक्षम करण्यासाठी वनहक्क कायद्यांतर्गत मिळालेल्या जमिनींवर आता आदिवासींना स्वतंत्र सातबारा उतारा आणि गाव नमुना १२ ई लागू करण्यात आला आहे, अशी घोषणा महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी विधानमंडळाच्या दोन्ही सभागृहांत केली. सभागृहात निवेदन देतांना महसूलमंत्री म्हणाले की आतापर्यंत वनपट्‌टा मंजूर झाल्यानंतर आदिवासी बांधवांची नावे सातबारा उताऱ्यावरील केवळ 'इतर हक्क' या सदरात नोंदवली जात होती, तर मुख्य मालकी हक्काच्या जागी 'महाराष्ट्र शासन वने' असा उल्लेख असायचा. या तांत्रिक अडचणीमुळे आदिवासी शेतकऱ्यांना 'फार्मर आयडी' मिळण्यात, बँकांकडून कृषी पीक कर्ज घेण्यात, कृषी विभागाच्या योजनांचा लाभ आणि नैसर्गिक आपत्तीच्या वेळी नुकसानभरपाई मिळवण्यात व्यावहारिक अडचणी येत होत्या. यावर कायमस्वरूपी तोडगा काढण्यासाठी एका विशेष समितीची स्थापना करण्यात आली होती, त्यानंतर हा निर्णय घेण्यात आला. आता गाव नमुना ७ ई मध्ये थेट संबंधित वनपट्‌टाधारकाची नोंद केली जाईल, तर गाव नमुना १२ ई मध्ये संबंधित जमिनीवरील पिकांची नोंद घेतली जाईल. या निर्णयामुळे आदिवासी बांधवांना  'ॲग्रीस्टॅक' सह सर्व कृषी विषयक शासकीय सुविधांचा

लाभ अधिक सुलभतेने आणि तातडीने घेता येणार असल्याचं बावनकुळे यांनी सांगितलं.

**बांबू गार्डन**

अमरावती विभागातील वनक्षेत्रात जखमी, अपघातग्रस्त व संकटात सापडलेल्या वन्यजीवांवर अत्याधुनिक उपचार करून त्यांचे पुनर्वसन करण्यासाठी अमरावतीच्या बांबू गार्डन इथं समर्पित प्रादेशिक वन्यजीव बचाव, उपचार आणि पुनर्वसन केंद्र उभारण्यात येणार आहे. या केंद्रासाठी शासन लवकरच मान्यता आणि निधी उपलब्ध करून देईल, अशी घोषणा वनमंत्री गणेश नाईक यांनी काल विधान परिषदेत केली.तत्पूर्वी आमदार संजय खोडके यांनी अपघात, विद्युत प्रवाहाचा धक्का, मानव-वन्यजीव संघर्ष, अनाथ पिल्ले तसेच जप्त करण्यात आलेल्या वन्यजीवांच्या उपचारासाठी अमरावती विभागात कोणतीही आधुनिक सुविधा उपलब्ध नसल्याचं निदर्शनास आणून दिलं.

**अमित शाह**

केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांनी राज्यातल्या अतिवृष्टी आणि पूरस्थितीविषयी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याशी चर्चा केली. या परिस्थितीचा सामना करण्यासाठी केंद्र सरकार राज्याला सर्वोतोपरी मदत करेल असं आश्वासन शाह यांनी दिलं.

**ब्रिक्स उद्यापासून**

तिसऱ्या ब्रिक्स परिवहन मंत्री कार्यगट परिषदेचं आयोजन उद्या पासून १२ जुलैदरम्यान नागपुरात करण्यात आलं आहे. या परिषदेला ब्रिक्स सदस्य राष्ट्रांसह ११ देशांचे परिवहन मंत्री आणि वरिष्ठ अधिकारी उपस्थित राहणार असून केंद्रीय रस्ते वाहतूक आणि महामार्ग मंत्री नितीन गडकरी ११ जुलै रोजी होणाऱ्या ब्रिक्स परिवहन मंत्र्यांच्या बैठकीचं अध्यक्षस्थान भूषविणार आहेत. ही परिषद भारताच्या ब्रिक्अध्यक्षतेच्या 'अनुकूलन, नवोन्मेष, सहकार्य आणि शाश्वततेसाठी निर्माण ' या संकल्पनेअंतर्गत आयोजित करण्यात येत आहे. रशिया आणि ब्राझील यांनी आयोजित केलेल्या परिवहन कार्यगटाच्या पहिल्या दोन महत्त्वपूर्ण बैठकीनंतर होत

असलेल्या या तिसऱ्या बैठकीचा उद्देश आंतरराष्ट्रीय परिवहन सहकार्याला अधिक बळकटी देणं  हा आहे.

**जमीन अधिग्रहण**

अकोला-हैदराबाद राष्ट्रीय महामार्गावरील तोंडगाव टोल प्लाझा जमीन अधिग्रहण मोबदला प्रकरणात वाशीम जिल्हा न्यायालयाने प्लाझा जप्त करण्याचे आदेश दिले आहेत. वाशीम बायपाससाठी संपादित जमिनीचा मोबदला न मिळाल्याने शेतकरी बेबिताई गर्जे आणि  विठ्ठल गर्जे यांनी न्यायालयात धाव घेतली होती. न्यायालयाने काल  जप्ती वॉरंट बजावत टोल प्लाझा जप्त करण्याचे आदेश दिले.

**व्हीबी-जीरामजी   कार्यशाळा**

व्हीबी-जीरामजी कायद्यावरील कार्यशाळा विधान भवनात मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या उपस्थितीत पार पडली. रोजगार हमी योजना मंत्री भरत गोगावले यांनी या योजनेतून ग्रामीण भागाच्या सर्वांगीण विकासाची मोठी क्षमता असल्याचं सांगितलं. रोजगार हमीचे दिवस १०० वरून १२५, तर कामांची संख्या २६६ वरून ३१८ करण्यात आल्याची माहिती त्यांनी दिली. केंद्रीय ग्रामविकास विभागाच्या सहसचिव रोहिणी भाजीभाकरे यांनी प्रत्येक ग्रामपंचायतीने पुढील पाच वर्षांत ‘विकसित ग्रामपंचायत आराखडा’ तयार करण्याचं आवाहन यावेळी केलं.

**'राम रक्षा आंदोलन'**

राम मंदिरासाठी जमा झालेल्या देणगीचा हिशोब जाहीर करून कथित गैरव्यवहाराची सखोल चौकशी करण्याच्या मागणीसाठी यवतमाळ इथं शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) पक्षाच्या शिवसैनिकांनी दत्त चौकात आंदोलन केलं. श्री दत्त मंदिरात प्रभू श्रीरामाची आरती करून 'राम रक्षा आंदोलन' करण्यात आले. यावेळी संपर्क प्रमुख राजेंद्र गायकवाड यांनी भूमिका मांडली, तर कार्यकर्त्यांनी घोषणाबाजी करत निषेध व्यक्त केला.

**मोर्चा**

भंडारा जिल्ह्यातील ७९४ जिल्हा परिषद शाळांमध्ये सुमारे ८०० शिक्षकांची पदे रिक्त असल्याचा आरोप करत काँग्रेसच्या वतीने आज जिल्हाधिकारी

कार्यालयावर मोर्चा काढण्यात आला. या मोर्चात शाळकरी विद्यार्थीही सहभागी झाले असून, ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांच्या शिक्षणासाठी तातडीने शिक्षकांची नियुक्ती करण्याची मागणी करण्यात आली.

**'ज्ञानभारतम्'**

भारतातली हजारो वर्षांची सांस्कृतिक, सामाजिक आणि बौद्धिक परंपरा जपणारी प्राचीन हस्तलिखितांचं संरक्षण, संवर्धन आणि पुढील पिढ्यांसाठी जतन करण्याच्या उद्देशाने 'ज्ञानभारतम्' हे राष्ट्रीय हस्तलिखित सर्वेक्षण अभियान सुरू करण्यात आलं आहे. नागरीकांनी ७५ वर्षांपेक्षा जुनी पुस्तकं, हस्तलिखिते आणि दुर्मिळ ग्रंथ यांची माहिती 'ज्ञानभारतम्' ॲपवर किंवा वेबसाइटवर नोंदवून या ऐतिहासिक राष्ट्रीय उपक्रमात सहभागी होण्याचं आवाहन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केलं आहे.

**हवामान**

येत्या  काही तासात यवतमाळ, वर्धा आणि नागपूर जिल्ह्यात हलक्या ते मध्यम स्वरूपाच्या पावसाची शक्यता असून या दरम्यान काही ठिकाणी मेघगर्जनेसह वादळी पर्जन्यमान देखील राहू शकतं असा अंदाज नागपूरच्या प्रादेशिक हवामान विभागाने वर्तवला आहे.  याशिवाय अकोला अमरावती आणि बुलढाणा जिल्ह्यांमध्ये तुरळक ठिकाणी हलक्या पावसाची शक्यता वर्तवण्यात आली आहे. दरम्यान, भंडारा जिल्ह्यात मान्सून दाखल झाल्याने शेतकऱ्यांनी धानाचे पेरे टाकायला सुरुवात केली आहे. तर अनेक दिवसाच्या प्रतीक्षेनंतर अकोल्यात पावसाने आज दमदार हजेरी लावली.

**सूक्ष्म सिंचन**

अनुसूचित जाती-जमातीच्या शेतकऱ्यांना सूक्ष्म सिंचनाचा लाभ मिळावा यासाठी १ ते ३१ जुलैदरम्यान विशेष मोहीम राबविण्यात येत आहे. प्रधानमंत्री राष्ट्रीय कृषी विकास योजनेअंतर्गत पात्र शेतकऱ्यांना विविध योजनांच्या माध्यमातून सूक्ष्म सिंचनासाठी ९० टक्क्यांपर्यंत अनुदान मिळणार असून, महाडीबीटी पोर्टलवर ऑनलाइन अर्ज करण्याचं आवाहन कृषी विभागानं केलं आहे.

********